जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
मो.क्र.9819208279

प्रेसनोट **दिनांक ११.१२.२०२५**

''खंडणी विरोधी पथक, गुन्हे शाखा, ठाणे यांचेकडुन एम.डी. (मेफेड्रोन) हा अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमाकडुन १०,८८,०००/- रु किमंतीचा १०८.८ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रोन) हा अंमली पदार्थ, एक अग्नीशस्त्र व एक जिवंत काडतुस जप्त''

गोपनिय बातमीदारांकडुन प्राप्त माहितीच्या आधारे दिनांक ८/१२/२०२५ रोजी २२.५० वा. रुम नं. ००२, डी विंग, श्री.गजानन रेसिडेन्सी, दिनकर विहार को.ऑप हौ.सोसायटी लिमि., काका ढाबा, हाजीमंलग रोड, आडवली, ढोकाळी, कल्याण पुर्व याठिकाणी इसम नामे आकिब इकबाल बागवान, वय ३३ वर्ष हा एकुण १०८ ग्रॅम ८ मिलीग्रॅम वजनाचा १०,८८,०००/- रु किंमतीचा एम.डी. (मफेड्रोन) हा अंमली पदार्थ विक्री करण्याकरिता जवळ बाळगला असतांना व ५००००/- रु किंमतीची गावठी बनावटीचे पिस्टल अग्नीशस्त्र विनापरवाना बेकायदेशीररित्या जवळ बाळगुन ठेवले असतांना मिळुन आला आहे. म्हणुन आरोपीत नामे १) **आकिब इकबाल बागवान याचेविरुध्द** मानपाडा पोलीस स्टेशन गुन्हा रजि नंबर १५०२/२०२५ एनडीपीएस ॲक्ट १९८५ कलम ८(क), २१(क), सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५ सह म.पो.कायदा कलम ३७(१)१३५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला. सदरचा आरोपी हा सराईत गुन्हेगार असुन बाजारपेठ पोलीस स्टेशन, कल्याण गुन्हा रजि नं. ५०५/२०२५ एन.डी.पी.एस कलम ८(क) २२(ब) व ५६०/२०२५ एन.डी.पी.एस कलम ८(क) २२(क) या दोन गुन्हयातील पाहिजे आरोपी असल्याचे निष्पन्न झाले आहे. गुन्हयातील अटक आरोपी याचेकडे चौकशी केली असता सदरचे अग्नीशस्त्र त्याने भरत शत्रुध्न यादव याचेकडुन घेतल्याचे सांगितले.

त्यामुळे गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे २) **भरत शत्रुध्न यादव याचा** तांत्रिक विश्लेषन व गुप्त बातमीदाराचे आधारे शोध घेवुन त्यास ताब्यात घेतल्यानंतर त्याचे अंगझडती मध्ये एक जिवंत काडतुस मिळुन आले आहे.

सदर गुन्हयाचे तपासामध्ये एकुण २ आरोपीना अटक करण्यात आलेली असुन त्याचेकडुन १०८.८ ग्रॅम वजनाचा एम.डी. (मेफेड्रोन) हा अंमली पदार्थ व एक अग्नीशस्त्र व एक जिवंत काडतुस असा एकुण ११,४१,०००/- रु किमंतीचा माल जप्त करण्यात आलेला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि/सुनिल तारमळे, नेम - खंडणी विरोधी पथक, ठाणे करीत आहे.

सदरची कारवाई श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), ठाणे, श्री.विनय घोरपडे, सहायक पोलीस आयुक्त, शोध -२, गुन्हे शाखा, ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली खंडणी विरोधी पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.शैलेश साळवी, सपोनि/सुनिल तारमळे, सहापोउपनिरी/भोसले, सपोउपरी/कानडे, पोहवा/ ठाकुर, राठोड, शिंदे, पाटील, गायकवाड, जाधव, गडगे, मपोहवा/ पावस्कर, चापोहवा/हिवरे, पोशि/वायकर, पाटील, शेजवळ, मपोशि/ भोसले यानी केली आहे.

(शैलेश साळवी)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर